महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, नंदुरबार व जळगाव या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांच्या सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्र.सीटीई-०९२२/प्र.क्र.१०२/पोल-३
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २२ ऑगस्ट, २०२३.

**वाचा:-**

१. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. असंक-१००१/प्र.क्र.२१/२००१/वित्तीय सुधारणा, दि. १०/०९/२००१.
२. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/विसु-१, दि. ११/०२/२०१६.
३. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.३०/२०१६/आपुकक्ष, दि.२५/०५/२०१७.
४. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि.०९/०६/२०१७.
५. वित्त विभाग, शासन परिपत्रक क्र. पदनि-०६१७/प्र.क्र.२०/आपुक, दि.२९/०६/२०१७.
६. गृह विभाग, शासन निर्णय क्र. पीएमएन-०८२१/प्र.क्र.५३३/पोल-५ ब, दि.२५/०२/२०२२.
७. वित्त विभाग, शासन निर्णय क्र. पदनि-२०२२/प्र.क्र.१५/आपुक, दि.२७/०४/२०२२.
८. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे कार्यालयाचे पत्र क्र.पोमसं/४४/मनुष्यबळ-आकृतीबंध/२६-ब/१२-अ/२०१४/२५०, दि.१४/०९/२०२२.
९. मा.मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय सचिव समितीच्या दि.१३/१२/२०२२ रोजीच्या सन २०२२ मधील ०५ व्या बैठकीचे इतिवृत्त.

**प्रस्तावना:-**

उपरोक्त संदर्भ क्र. १ ते ५ येथील वित्त विभागाच्या शासन निर्णयाव्दारे सर्व प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील व त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील कार्यालयाच्या आस्थापनेवरील मंजूर पदांच्या आढाव्यांच्या प्रस्तावांना मान्यता देण्यासाठी गठीत अ.मु.स.(सेवा)/साप्रवि व प्र.स.(व्यय) वित्त विभाग यांच्या अध्यक्षतेखालील उपसमिती व मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य यांचे अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या मान्यतेने सुधारित आकृतीबंध निश्चित करणेबाबतचे निर्देश दिलेले होते.

२. उक्त संदर्भ क्र. ६ येथील गृह विभाग, शासन निर्णय, दि. २५/०२/२०२२ व्दारे पोलीस घटकांतील पोलीस नाईक हा संवर्ग रद्द करुन, या संवर्गातील पदे सहायक पोलीस उप निरीक्षक, पोलीस हवालदार, पोलीस शिपाई या पदात वर्ग करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार आवश्यक ते बदल करुन सुधारित पदांची माहिती या पोलीस घटक कार्यालयाच्या आकृतीबंध प्रस्तावामध्ये दर्शविण्यात आली आहे.

३. त्यानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, नंदुरबार व जळगाव या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचा सुधारित आकृतीबंध प्रस्ताव मंजूरीकरिता पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भीय क्र. ८ येथील दि.१४/०९/२०२२ रोजीच्या पत्राव्दारे शासनास सादर करण्यात आला होता.

४. त्यानुसार उक्त संदर्भ क्र.९ येथील मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या सन २०२२ मधील ५ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, नंदुरबार व जळगाव या घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील नियमित व बाह्ययंत्रणेव्दारे घ्यावयाचे मनुष्यबळ सेवा अशा सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात आली.

**<u>शासन निर्णय :-</u>**

पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी संदर्भीय क्र.८ येथील पत्राव्दारे सादर केलेल्या प्रस्तावानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, नंदुरबार व जळगाव या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचे सुधारित आकृतीबंधाचा प्रस्ताव हे नवीन पदनिर्मिती/पदांचे पुनरुज्जिवन व पदांचे आढावे इ. प्रस्तावांची सखोल तपासणी करण्यासाठी स्थापन केलेल्या मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समिती समोर प्रस्ताव सादर केला होता.

२. सदरहू उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या सन २०२२ मधील ५ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, नंदुरबार व जळगाव या पोलीस घटक कार्यालयांच्या आस्थापनेवरील घटकनिहाय एकूण नियमित **१४,३०७** पदे व बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या मनुष्यबळाच्या एकूण **२१०** सेवा अशा सुधारित आकृतीबंधास मान्यता देण्यात येत आहे.

३. सुधारित आकृतीबंधानुसार महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, नंदुरबार व जळगाव या घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील नियमित पदांची, तसेच बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या मनुष्यबळाची माहिती (पदनाम, वेतन श्रेणी, मंजूर पदे) **परिशिष्ट-अ,ब,क,ड,इ,ई** मध्ये दर्शविल्याप्रमाणे सोबत जोडण्यात आली आहे.

४. महाराष्ट्र पोलीस दलामधील विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र व पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण, अहमदनगर, धुळे, नंदुरबार व जळगाव या पोलीस घटक कार्यालयाच्या आस्थापनेवरील पदांचे सुधारीत आकृतीबंधास खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून मंजूरी देण्यात येत आहे.

अ) या शासन निर्णयाच्या सोबतच्या परिशिष्टांमधील (ब) मध्ये दर्शविलेल्या मनुष्यबळ संख्येच्या मर्यादित सेवा आवश्यकतेनुसार बाह्य यंत्रणेव्दारे घेण्यास मान्यता देण्यात येत आहे. तथापि, त्या संबंधित संवर्गात सध्या मृत

संवर्ग म्हणून पदे कार्यरत असल्यास ती पदे वगळून उर्वरित मनुष्यबळ संख्येच्या प्रमाणात सेवा बाह्य यंत्रणेकडून घेण्यात याव्यात. मृत संवर्गातील पदे जशी निरसित होतील, त्या प्रमाणे आवश्यकतेनुसार बाह्य यंत्रणेव्दारे सेवा घेण्यात याव्यात.

आ) बाह्य यंत्रणेव्दारे सेवा घेतांना, वित्त विभागाच्या संदर्भीय क्र.७ येथील दिनांक २७/०४/२०२२ चा व त्या अनुषंगाने वेळोवेळी निर्गमित झालेल्या शासन निर्णयातील मार्गदर्शक सूचनांचे पालन करण्याची दक्षता घ्यावी.

५. हा शासन निर्णय मा. मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखालील उच्च स्तरीय सचिव समितीच्या दिनांक १३/१२/२०२२ रोजीच्या सन २०२२ मधील ५ व्या बैठकीच्या इतिवृत्तानुसार व वित्त विभागाच्या अनौपचारीक संदर्भ क्र.अनौसं-२०९/आपुक, दिनांक १८/०४/२०२३ व्दारे दिलेल्या मान्यतेनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

६. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२३०८२२१७४१४४६६२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

**( कैलास गायकवाड )**
**सह सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई
३) मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) मा. विरोधी पक्षनेता, विधानसभा/विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, मुंबई
६) सर्व सन्माननीय संसद, विधानसभा, विधान परिषद सदस्य यांचे खाजगी सचिव.
७) अपर मुख्य सचिव (गृह), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
८) अपर मुख्य सचिव, गृह (अपील व सुरक्षा), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.
९) अपर मुख्य सचिव (सेवा), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई
१२) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य पोलीस गृह निर्माण व कल्याण महामंडळ.
१३) प्रधान सचिव (विशेष), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई
१४) अपर पोलीस महासंचालक महाराष्ट्र, प्रशिक्षण व खास पथके, राज्य, मुंबई.
१५) विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक परिक्षेत्र.
१६) पोलीस अधीक्षक, नाशिक ग्रामीण/ अहमदनगर/ धुळे/ नंदुरबार/ जळगाव.

१७) महालेखापाल-१/२ (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

१८) महालेखापाल-१/२ (लेखापरिक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

१९) संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई.

२०) संबधित सर्व अधिदान व लेखा अधिकारी.

२१) संबधित सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.

२२) सह सचिव (पोल ३), गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

२३) निवासी लेखा परीक्षा अधिकारी, वांद्रे, मुंबई.

२४) वित्त विभाग (व्यय-७)/वित्तीय सुधारणा-१/आ.पु.क.

२५) सर्व सबंधित कक्ष अधिकारी/अवर सचिव, गृह विभाग, मंत्रालय, मुंबई.

२६) निवड नस्ती, पोल-३.

## " परिशिष्ट - इ "
## घटकाचे नाव:- पोलीस अधीक्षक, नंदुरबार यांचे कार्यालय.

### अ) एकूण नियमित पदे

| अ.क्र. | सध्याचे पदनाम | दि. ३०.०९.२०२१ पर्यंतची मंजूर पदे | वेतनसंरचना | आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| **A) पोलीस अधिकारी व अमंलदार यांची पदे** | | | | |
| १ | पोलीस अधीक्षक | १ | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| २ | अपर पोलीस अधीक्षक | १ | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| ३ | पोलीस उप अधीक्षक | ५ | S-२० : ५६१००-१७७५०० | ५ |
| ४ | पोलीस निरीक्षक | १८ | S-१८ : ४९१००-१५५८०० | १८ |
| | **एकूण गट - अ (वर्ग-१)** | **२५** | | **२५** |
| ५ | सहायक पोलीस निरीक्षक | १८ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १८ |
| ६ | पोलीस उप निरीक्षक | ५४ | S-१४ : ३८६००-१२२८०० | ५४ |
| | **एकूण गट - ब (वर्ग-२)** | **७२** | | **७२** |
| ७ | सहायक पोलीस उप निरीक्षक | १५४ | S-१० : २९२००-९२३०० | १५४ |
| ८ | पोलीस हवालदार | ४१५ | S-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | ४१५ |
| ९ | पोलीस नाईक | ० | S-८ : २५५००-८११०० + विशेष वेतन रु.७५०/- | मृत संवर्ग |
| १० | पोलीस शिपाई | ८५३ | S-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | ८५३ |
| ११ | सहायक पोलीस उप निरीक्षक चालक | १ | S-१० : २९२००-९२३०० | १ |
| १२ | पोलीस हवालदार चालक | ११ | S-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | ११ |
| १३ | पोलीस नाईक चालक | ० | S-८ : २५५००-८११०० + विशेष वेतन रु.३००/- | मृत संवर्ग |
| १४ | पोलीस शिपाई चालक | ४५ | S-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | ४५ |
| | **एकूण गट - क (वर्ग-३)** | **१,४७९** | | **१,४७९** |
| **B) प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे** | | | | |
| १५ | कार्यालय अधीक्षक | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| १६ | स्थापत्य कनिष्ठ अभियंता | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| १७ | उच्चश्रेणी लघुलेखक | १ | S-१६ : ४४९००-१४२४०० | १ |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | सहायक लेखाधिकारी | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ |
| | **एकूण गट - ब (वर्ग-२)** | **४** | | **४** |
| १९ | लघुटंकलेखक | १ | S-८ : २५५००-८११०० | १ |
| २० | प्रमुख लिपीक | ५ | S-१३ : ३५४००-११२४०० | ५ |
| २१ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | १२ | S-८ : २५५००-८११०० | १२ |
| २२ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | २५ | S-६ : १९९००-६३२०० | २५ |
| | **एकूण गट - क (वर्ग-३)** | **४३** | | **४३** |
| २३ | प्रमुख आचारी | २ | S-५ : १८०००-५६९०० | मृत संवर्ग |
| २४ | सहायक अचारी | ५ | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| २५ | भोजनसेवक | ५ | S-१ : १५०००-४७६०० | मृत संवर्ग |
| २६ | सफाई कामगार | ३ | S-१ : १५०००-४७६०० | मृत संवर्ग |
| २७ | कार्यालयीन शिपाई | ८ | S-१ : १५०००-४७६०० | मृत संवर्ग |
| | **एकूण गट - ड (वर्ग-४)** | **२३** | | **०** |
| | **एकूण गट अ ते ड मधील पदे** | **१,६४६** | | **१६२३** |

**ब) बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|
| १ | प्रमुख आचारी | २ |
| २ | सहायक अचारी | ५ |
| ३ | भोजनसेवक | ५ |
| ४ | सफाई कामगार | ३ |
| ५ | कार्यालयीन शिपाई | ८ |
| | **बाह्य यंत्रणेचे एकूण मनुष्यबळ** | **२३** |

*****

### " परिशिष्ट - ई "

### घटकाचे नाव:- पोलीस अधीक्षक, जळगाव यांचे कार्यालय.

अ) एकूण नियमित पदे

| अ. क्र. | सध्याचे पदनाम | दि. ३०.०९.२०२१ पर्यंतची मंजूर पदे | वेतनसंरचना | आकृतीबंधानुसार मंजूर पदे |
|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ |
| | **A) पोलीस अधिकारी व अमंलदार यांची पदे** | | | |
| १ | पोलीस अधीक्षक | १ | S-२३ : ६७७००-२०८७०० | १ |
| २ | अपर पोलीस अधीक्षक | २ | S-२३ : ६७७००-२०८७०० | २ |
| ३ | पोलीस उप अधीक्षक | १० | S-२० : ५६१००-१७७५०० | १० |
| ४ | पोलीस निरीक्षक | ३३ | S-१८ : ४९१००-१५५८०० | ३३ |
| ५ | राखीव पोलीस निरीक्षक | १ | S-१८ : ४९१००-१५५८०० | १ |
| | **एकूण गट - अ (वर्ग-१)** | **४७** | | **४७** |
| ६ | सहायक पोलीस निरीक्षक | ५८ | S-१५ : ४१८००-१३२३०० | ५८ |
| ७ | पोलीस उप निरीक्षक | १०८ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १०८ |
| ८ | राखीव पोलीस उप निरीक्षक | ३ | S-१४ : ३८६००-१२२८०० | ३ |
| | **एकूण गट - ब (वर्ग-२)** | **१६९** | | **१६९** |
| ९ | सहायक पोलीस उप निरीक्षक | ३९८ | S-१० : २९२००-९२३०० | ३९८ |
| १० | पोलीस हवालदार | १,०१६ | S-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | १,०१६ |
| ११ | पोलीस नाईक | ० | S-८ : २५५००-८११०० + विशेष वेतन रु.७५०/- | मृत संवर्ग |
| १२ | पोलीस शिपाई | २,००५ | S-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | २,००५ |
| १३ | सहायक पोलीस उप निरीक्षक चालक | ४ | S-१० : २९२००-९२३०० | ४ |
| १४ | पोलीस हवालदार चालक | १० | S-९ : २६४००-८३६०० + विशेष वेतन रु.७५०/- | १० |
| १५ | पोलीस नाईक चालक | ० | S-८ : २५५००-८११०० + विशेष वेतन रु.३००/- | मृत संवर्ग |
| १६ | पोलीस शिपाई चालक | २४ | S-७ : २१७००-६९१०० + विशेष वेतन रु.७५०/- | २४ |
| | **एकूण गट - क (वर्ग-३)** | **३,४५७** | | **३,४५७** |
| | **B) प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांची पदे** | | | |
| १७ | वैद्यकीय अधिकारी | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ |
| | **एकूण गट - अ (वर्ग-१)** | **१** | | **१** |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १८ | कार्यालय अधीक्षक | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| १९ | उच्च श्रेणी लघुलेखक | २ | S-१६ : ४४९००-१४२४०० | २ |
| २० | सहायक लेखाधिकारी | १ | S-१५ : ४१८००-१३२३०० | १ |
| २१ | स्थापत्य कनिष्ठ अभियंता | १ | S-१४ : ३८६००-१२२८०० | १ |
| | **एकूण गट - ब (वर्ग-२)** | **५** | | **५** |
| २२ | प्रमुख लिपीक | ५ | S-१३ : ३५४००-११२४०० | ५ |
| २३ | वरिष्ठ श्रेणी लिपीक | २४ | S-८ : २५५००-८११०० | २४ |
| २४ | कनिष्ठ श्रेणी लिपीक | ५० | S-६ : १९९००-६३२०० | ५० |
| २५ | औषधनिर्माता | १ | S-१० : २९२००-९२३०० | १ |
| २६ | परिचारीका | १ | S-१३ : ३५४००-११२४०० | १ |
| २७ | लघुटंकलेखक | १ | S-८ : २५५००-८११०० | १ |
| | **एकूण गट - क (वर्ग-३)** | **८२** | | **८२** |
| २८ | कार्यालयीन शिपाई | ९ | S-१ : १५०००-४७६०० | मृत संवर्ग |
| २९ | दप्तरी | १ | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| ३० | आचारी | २ | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| ३१ | प्रमुख आचारी | १ | S-५ : १८०००-५६९०० | मृत संवर्ग |
| ३२ | सहायक अचारी | २ | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| ३३ | कक्षसेवक | १ | S-१ : १५०००-४७६०० | मृत संवर्ग |
| ३४ | माळी | १ | S-१ : १५०००-४७६०० | मृत संवर्ग |
| ३५ | मोची | २ | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| ३६ | शिंपी | २ | S-३ : १६६००-५२४०० | मृत संवर्ग |
| ३७ | व्रणोपचार | १ | S-५ : १८०००-५६९०० | मृत संवर्ग |
| ३८ | सफाई कामगार | ३६ | S-१ : १५०००-४७६०० | मृत संवर्ग |
| | **एकूण गट - ड (वर्ग-४)** | **५८** | | **०** |
| | **एकूण गट अ ते ड मधील पदे** | **३,८१९** | | **३,७६१** |

**ब) बाह्य यंत्रणेव्दारे घ्यावयाच्या सेवा**

| अ.क्र. | सेवा | मनुष्यबळ संख्या |
|---|---|---|
| १ | कार्यालयीन शिपाई | ९ |
| २ | दप्तरी | १ |

| | | |
|---|---|---|
| ३ | आचारी | २ |
| ४ | प्रमुख आचारी | १ |
| ५ | सहायक अचारी | २ |
| ६ | कक्षसेवक | १ |
| ७ | माळी | १ |
| ८ | मोची | २ |
| ९ | शिंपी | २ |
| १० | व्रणोपचार | १ |
| ११ | सफाई कामगार | ३६ |
| | **बाह्य यंत्रणेचे एकूण मनुष्यबळ** | **५८** |

*****************